MHBI120003352018

**नियमित दिवाणी दावा क्र. ६७/२०१८ मधील निशाणी क्रमांक ३२ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज गोरख नामदेव मात्रे यांनी वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे कायदेशीर वारस प्रस्तुत दाव्यात वादी सदरात समाविष्ठ करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** उपरोक्त अर्जदार यांनी असे नमुद केले आहे की, वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे हे दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले असून ताबेकब्ज्यात आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरूध्द दाद मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अर्जदार यांनी वादी क्र.१ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे वादमिळकती बाबत अर्जदार हे वादी क्र.१ यांचे कायदेशीर वारस आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना वादी क्र. १चा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून दाव्यात सामाविष्ठ करणे आवश्यक आहे.

**३.** अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, दावा कायम मनाईसाठी आहे, अर्जदार हा मयताचा वारस नसून खरेदीदार आहे. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

**४.** अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले आहेत असे वादी यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी वादी क्र.१ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे मृत्यूनंतर वादमिळकतीमधील वादी क्र. १ यांच्या हिस्स्याच्या मिळकती बाबत अर्जदार हे कायदेशीर वारस झाले आहेत. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी क्रमांक १ हे इतर वादींसोबत वाद मिळकतीचे सहमालक असलेबाबत वादीचे कथन आहे. वाद मिळकतीमधील वादीच्या हिस्स्याच्या मिळकतीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये असा मनाई हुकूम वादी यांनी मागितलेला आहे. वादी क्रमांक १ यांच्या मालकीच्या मिळकतीचे संरक्षण करण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादी क्रमांक १ यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या हिस्स्याच्या मिळकतीमध्ये अर्जदार यांना कायदेशीर हक्क, अधिकार प्राप्त झाले आहेत व सदर मिळकतीचे संरक्षण करण्याचे अधिकार प्राप्त होणार आहेत. अशा परिस्थीतीत अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात वादमिळकतीचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करू नये असा मनाई हुकूम मागण्याचा अधिकार प्राप्त होत आहे. वादी क्रमांक १ यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करून न घेतल्यास त्यांच्या हिस्स्याच्या मिळकतीबाबत मनाई हुकूम मागण्याच्या अधिकारापासून ते वंचित राहणार आहेत. याउलट त्यांना दाव्यात समाविष्ठ केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब वादी क्रमांक १ यांच्या वारसांना प्रस्तुत प्रकरणात सामील करून घेणे आवश्यक आहे.

**६.** वादी क्र. १ हे दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. दिनांक ०३.०९.२०१९ पर्यंत त्यांचे वारस अभिलेखावर देणे आवश्यक होते. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०२.१२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर निशाणी क्र. ३४ येथील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. सबब, वादी क्रमांक १ यांचे कायदेशीर वारस म्हणून

अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करणे योग्य होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे :

**आदेश**

**१.** सदरचा अर्ज (**निशाणी क. ३२**) मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे कायदेशीर वारस म्हणून गोरख नामदेव मात्रे यांना प्रस्तुत दाव्यात वादी सदरात समाविष्ठ करण्याची परवानगी देण्यात येते.

**३.** वादी यांनी वादपत्रामध्ये आवश्यक दुरूस्ती पुढील तारखेस करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2021.12.10 11:40:49 +0530

दि. ०९.१२.२०२१
स्थळ: धारूर

(रा.व.कदम)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, धारूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द—नि—शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १०.१२.२०२१ |

**सही/—**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड—३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर